# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## पश्चिम बंगाल ते नागपूर : वाट चुकलेल्या किशोराची सुखरूप सुटका




नागपूर मेट्रो स्थानकावर एक १४ वर्षीय बंगाली भाषिक किशोर वाट चुकून पोहोचला होता. हिंदी किंवा अन्य स्थानिक भाषा न येण्याच्या कारणाने त्याचा मेट्रो कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्यात अडथळा येत होता. मात्र, मेट्रो अधिकाऱ्यांनी वेळेवर घेतलेली तातडीची व सहृदय कारवाई यामुळे सदर किशोराला अनवस्था घटनेपासून वाचवता आले.

घटनेनुसार, बिनोद (नाव बदललेले) नावाचा मुलगा दोसर वैश्य चौक मेट्रो स्थानकावरील तिकीट खिडकीवर पोहोचला. त्याला बंगाली व्यतिरिक्त इतर कोणतीही भाषा न येत असल्याने संवाद होणे कठीण झाले. यावेळी स्टेशन कंट्रोलर श्री. शुभम बडोले यांनी पुढे येत हस्तक्षेप केला. त्यांनी ओळख पटवून घेतली आणि परिस्थितीचे गांभीर्य ओळखून श्रीमती आशा सोनकुसरे (सफाई कर्मचारी, कॉटन मार्केट), या बंगाली भाषिक कर्मचाऱ्यांची मदत घेतली.

बिनोदने सांगितले की, त्याचा त्याच्या कुटुंबाशी संपर्क तुटला असून, तो रेल्वे स्थानक शोधण्याचा प्रयत्न करीत होता. याची माहिती सुरक्षा विभागाचे निरीक्षक श्री. गणेश गारकल यांना देण्यात आली. त्यानंतर बिनोदला नागपूर रेल्वे स्थानकावरील रेल्वे सुरक्षा बल (RPF) पोलिस ठाण्यात सुपूर्त करण्यात आले.

बिनोद हा महिपालपूर, हुगळी जिल्हा, पश्चिम बंगाल येथील रहिवासी असून, त्याला एफएमएस पर्यवेक्षक श्री. प्रेमदास बोरकर यांच्या हस्ते चाईल्डलाईन अधिकाऱ्यांकडे सुपूर्त करण्यात आले. चाईल्डलाईनने तातडीने मुलाच्या पालकांशी संपर्क साधून त्यांना माहिती दिली आहे.

महामेट्रोच्या कर्मचाऱ्यांचे तात्काळ आणि सहृदय कार्य कौतुकास्पद

ही घटना फक्त एक प्रशासकीय प्रक्रिया नव्हे, तर एका अल्पवयीन मुलाच्या सुरक्षिततेसाठी आणि भविष्यातील संभाव्य अपघात टाळण्यासाठी दाखवलेली मानवी संवेदनशीलतेची उत्कृष्ट उदाहरण ठरली आहे..